आधुनिक विचारांचे
# वर्तमान



रयतेचे राजे विश्ववंदनीय
छत्रपती शिवाजी महाराज
यांच्या जयंतीनिमित्त
त्यांच्या महान विचारांना
विनम्र अभिवादन!
: संपादक

बीड । मंगळवार, १६ फेब्रुवारी २०२१ । वर्ष : ३ आपले वृत्तपत्र, आपला आवाज अंक : १७ । पाने : ४ । मूल्य २ ₹

# ‘वर्तमान’ म्हणजे सकारात्मक पत्रकारिता

## मंगेश चिवटे यांचे गौरवोद्गार; वर्तमान फाऊंडेशनचा सन्मान सोहळा थाटात

▶ प्रतिनिधी

**माजलगाव : सकारात्मक पत्रकारिता म्हणजे वर्तमान माध्यम समूह हे समीकरण अल्पावधीत रूढ झाले आहे. समाजाचे आपण देणेकरी लागतो या भावनेतून सामाजिक क्षेत्रात उतरलेल्या वर्तमान फाऊंडेशनचे कार्य दखल घेण्यासारखे आहे, असे गौरवोद्गार शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे (मुंबई) यांनी माजलगाव येथे शुक्रवारी ‘वर्तमान’च्या सन्मान सोहळ्यात काढले. दरम्यान, वर्तमान फाऊंडेशनचा सन्मान सोहळा अतिशय थाटात पार पडला.**



वर्तमान फाऊंडेशन आयोजित सन्मान सोहळ्याला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक तर प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, बीड जिल्हा परिषदेचे सभापती कल्याण आबुज, शिवसेना तालुकाप्रमुख आप्पासाहेब जाधव, माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ यांची उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. माजलगाव (जि.बीड) येथील व्यंकटेश कॉन्फरन्स हॉलमध्ये झालेल्या सन्मान सोहळ्यात माधव निर्मळ (उद्योग भूषण), रमेश सोळंके (समाज भूषण), सारंग मिटकरी (समाज भूषण), सुभाष नाकलगावकर (पत्रकार भूषण), माजलगाव तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन (सहकार भूषण) यांना मान्यवर अतिथींच्या हस्ते विविध पुरस्कार बहाल करण्यात आले. यावेळी एनएसएल शुगर्स लिमिटेड संचलित जय महेश शुगर्सचे उपाध्यक्ष गिरीष लोखंडे (उद्योग), डॉ.यशवंत राजेभोसले (आरोग्य सेवा), डॉ.प्रसाद कुलकर्णी (आरोग्य सेवा), गौरव ओमप्रकाश शर्मा (समाज सेवा), बाबा श्रीहरी देशमाने (पत्रकारिता), प्रकाश काशिद (पत्रकारिता), दत्ता येवले (वृत्तपत्र सेवा), सोन्या सोळंके (अभिनय) यांचा आपआपल्या क्षेत्रातील योगदानाबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. प्रस्ताविकपर भाषणात वर्तमान फाऊंडेशनचे सल्लागार तथा जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत शेजुळ म्हणाले, सकारात्मक पत्रकारिता कशी असावी याचा परिपाठ वर्तमान माध्यम समुहाने घालून दिला आहे. ’वर्तमान’ने भविष्याचा वेध घेणारी पत्रकारिता केली असून बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेत वेगळे स्थान निर्माण केले आहे, याचे श्रेय ’वर्तमान’चे संपादक भगीरथ तोडकरी, ज्येष्ठ पत्रकार बाबा देशमाने आणि वर्तमान टीमला जाते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक म्हणाले,

(पान ४ वर)

### ’वर्तमान’चे वृत्तपत्र क्षेत्रात दमदार पाऊल : माधव निर्मळ

सन्मान सोहळ्याला उत्तर देताना माधव निर्मळ म्हणाले, वर्तमान माध्यम समूहाचे सल्लागार संपादक चंद्रकांत शेजुळ यांनी विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यांनी वर्तमानच्या माध्यमातून वृत्तपत्र क्षेत्रातही दमदार पाऊल टाकले आहे. वर्तमानचा अधिक विस्तार करावा सामाजिक बातम्यांना अधिक प्राधान्य द्यावे, हे वृत्तपत्र लवकरच दैनिक स्वरूपात प्रसिद्ध व्हावे यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच डॉ.यशवंत राजेभोसले, सोन्या सोळंके यांनाही आपले मनोगत व्यक्त केले.

### ’वर्तमान’च्या संकेतस्थळाचे लोकार्पण

’आपले वृत्तपत्र, आपला आवाज’ हे ब्रीद घेवून पत्रकारितेत सक्रीय झालेल्या वर्तमान माध्यम समुहाने एक पाऊल पुढे टाकत आपल्या संकेतस्थळाची निर्मिती केली आहे, या संकेतस्थळाचे लोकार्पण शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. संकेतस्थळाशी कनेक्ट राहण्यासाठी www.vartmannews.in वर क्लिक करा.

सचित्र वृत्तांत (पान तीनवर)









## संपादकीय

# महासत्तेतील दुर्बलस्थानं

अमेरिकेची जगभर महासत्ता म्हणून ख्याती आहे. मात्र महासत्तेतील लोकशाहीत पण काही दुर्बलस्थाने आहेत. ओहोटी आली की, काठावरची खडकं जशी गोचर होतात तसंच संकट कोसळलं की माणसाचे किंवा देशाचे गुणदोष दृष्टिपथास पडतात. अमेरिकेच्या संसद भवनावर जानेवारी २०२१ मध्ये हल्ला झाल्यावर या देशाच्या लोकशाहीची कसोटी लागली आणि तिची काही दुर्बलस्थानं जगाला दिसली. ज्या काही टोकाच्या भूमिका घेण्यात आल्या व जी टोकाची विधाने करण्यात आली ती बघून जगाला साम्यवादी चीनची आठवण झाली. आतापर्यंत स्वातंत्र्यवादी मूल्यांचा व तात्त्विक समर्थनाचा साज चढवून देव्हा-यात ठेवलेला लोकशाहीचा देव म्हणजे एक दगड आहे हे जगाला कळलं आणि त्याला घृणा आली. याचा अर्थ या देशात उल्लेखनीय मूल्य किंवा दुरुस्ती क्षमता नाही असा नव्हे. तरी पण या हल्ल्यामुळे लोकशाहीला जो तडा गेला त्या बुजण्यास बराच काळ लागेल यात शंका नाही. अमेरिकेची २५० वर्षांची लोकशाही भारताच्या ७० वर्षांच्या राज्यप्रणालीपुढे फिकी ठरली. अमेरिकेत दोन मुख्य राजकीय पक्ष आहेत. एक डेमॉक्रेटिक, ज्याची तुलना आपल्या काँग्रेसशी करता येईल व दुसरा रिपब्लिकन. त्यात व आपल्या भाजपमध्ये बरंच मूल्यसाम्य आहे. ट्रम्पचं निमित्त वापरून डेमॉक्रेटिक पक्षानं रिपब्लिकन पक्षच नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू केले. ते जर यशस्वी झाले, तर या देशात मतभेद व विरोध न उरता एकपक्षीय निरंकुश सत्ता स्थापन होऊन तिची तुलना चीनशी करता येईल. अगोदरच त्या पक्षामध्ये ट्रम्पद्वेष दुथडी भरून वाहत आहे व या हल्ल्याचं निमित्त वापरून त्यानं ट्रम्पविरुद्ध शीघ्रगतीनं महाभियोग मंजूर केला. त्यांची सत्ता जवळजवळ संपुष्टात येत असताना केवळ सूडबुद्धीनं हे पाऊल उचलण्यात आलं. त्याला काही मूठभर रिपब्लिकन पक्षाच्या प्रतिनिधींनीही साथ दिली. पण हे जरी मान्य केलं तरी अमेरिकेच्या लोकशाहीत कुणाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा कुणाला अधिकार नाही. जर्मनीच्या अँजेला मार्केल व ट्रम्प यांचं सूत कधीच जमलं नाही. तरीही त्यांनी अमेरिकन अध्यक्षांच्या स्वातंत्र्यावर गदा आली म्हणून निषेध नोंदवला. त्या पक्षाचा सूड ट्रम्पपुरता मर्यादित नसून त्यात त्यांना पाठिंबा देणारे राजकारणी व ७.४ कोटी मतदार यांचाही समावेश करण्यात आला. याप्रमाणे विरोधाला व विरोधकांना चिरडून एकपक्षीय राजवट स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू झाले. बायडन अध्यक्ष म्हणून निवडून आले. यासाठी अंतिम प्रमाणपत्र संसदेकडून लागतं. त्याची बैठक ज्या दिवशी हल्ला झाला त्या दिवशी विलंबानं झाली. त्यावेळी दोन सिनेटर्स (टेक्सासचे टेड क्रूझ व मिसुरीचे जॉश हॉली) आणि १४७ रिपब्लिकन प्रतिनिधींनी निवडणुकीत भ्रष्टाचार होता म्हणून विरोध केला. त्यात फारसं अप्रूप नाही. २०१६ मध्ये लोकसभापती पेलॉसीन ट्रम्पच्या विरुद्ध अशीच तक्रार केली होती. कनिष्ठ (ज्युनियर) बुशच्या वेळी देखील विरोध नोंदवण्यात आला होता. पण यावेळी डेमॉक्रेटिक नेते खवळले. त्यांनी या विरोधकांवर राजकीय दहशतवादी म्हणून टीका, तर केलीच पण त्यांची दहशतवाद्यांसाठी राखून ठेवलेल्या काळ्या प्रवेशबंदीच्या यादीत नोंदणी व्हावी अशी मागणी केली. म्हणजे विरोधकांना विमानानं प्रवेश करता येणार नाही. इथे पुन्हा डेमॉक्रेटिक पक्षाच्या पक्षश्रेष्ठीनं प्रगल्भता बाळगून निषेध व्यक्त केला नाही. द्रोपदीचं वस्त्रहरण होत असताना जसे मांडवातले श्रेष्ठजन गुपचूप बसले होते तसा हा प्रकार. मतभेद हा कुठल्याही लोकशाहीचा आत्मा. तोच गुन्हा समजण्यात आला व संविधानात्मक स्वातंत्र्याचं परिघीकरण केलं तर देशाचं एकाधिकाराच्या मार्गावर अध:पतन होण्यास फार वेळ लागणार नाही. असं केलिफोर्निया राज्यात झालं आहे. तिथे रिपब्लिकन पक्ष विरोध करण्यास तसा उरलाच नाही. त्यामुळे तिथे डेमॉक्रेटिक पक्षाची निरंकुश सत्ता असून ते राज्य झपाट्याने रसातळाला जात आहे. श्रीमंत लोक व कंपन्या राज्य सोडून मोठ्या संख्येनं स्थलांतर करीत आहेत. या संकटात दुसराही एक दोष प्रकट झाला. अमेरिकेची लोकशाहीवादी भांडवलशाही जनसन्मुख नसून उद्योगांच्या ताब्यात आहे हे सिद्ध झालं. ही टीका नवीन नाही. अनेक तज्ज्ञांनी अशी विधानं केली आहेत. पण यावेळी त्याचे पुरावे उजेडात आले. वर उल्लेख केलेल्या ज्या राजकारण्यांनी बायडनच्या प्रमाणीकरणाला आक्षेप घेतला त्यांना यापुढे आम्ही निवडणुकीसाठी आर्थिक पाठिंबा देणार नाही, असा अनेक नामवंत कंपन्यांनी निर्णय घेतला. हे सर्व अर्थातच डेमॉक्रेटिक पक्षाच्या दबावामुळे. बायडनची टोकाची धोरणं कधीच सूर्यप्रकाशात येणार नाहीत. असा निमुळता पाठिंबा असताना एवढी मुजोरी व शिरजोरी दाखवून विरोधी पक्षाचं श्राद्ध करण्याचे प्रयत्न जेवढे निष्फळ तेवढेच हानिकारक म्हणावे लागतील. यांचं घोडा मैदान फार दूर नाही. २०२२ मध्ये मध्यावधी निवडणुका संपन्न होतील. अशावेळी सत्तारूढ पक्ष लोकसभेत व सिनेटमध्ये जागा हरतो, असं इतिहास सांगतो. म्हणजे निदान लोकसभेत तरी रिपब्लिकन पक्ष सत्तेवर येण्याची दाट शक्यता आहे. म्हणजे त्याला डेमॉक्रेटिक पक्षावर सूड उगवण्याची संधी फार दूर नाही. त्यावेळी ते बायडन विरुद्ध महाभियोगाची प्रक्रिया सुरू करून सर्व देशाला पुन्हा ठप्प करू शकतील. त्यासाठी सबळ कारण उपलब्ध आहे. नवीन अध्यक्षांच्या मुलानं वडिलांच्या उपाध्यक्षपदाचा गैर वापर करून पैसे कमावले व त्यात खुद्द बायडन सहभागी होते ही माहिती एका कॉम्प्युटरवर निवडणुकीपूर्वी सापडली. पण ती सामाजिक व इतर माध्यमांनी बायडन जिंकून यावेत, म्हणून दाबून ठेवली. उपाध्यक्ष कमला हॅरिसला पदच्युत करण्यासाठी तर किती तरी पुरावे आहेत. तिने ब्लॅक लाईव्हज मॅटरसच्या चळवळीत खुनी व हिंसक आंदोलकांना प्रोत्साहन तर दिलंच पण त्यांना कैदेतून जामिनावर सोडवण्यासाठी दशलक्षावधी डॉलर उभे केले होते. याप्रमाणे महाभियोगाचं दुष्टचक्र यापुढे सुरू राहणार असे दिसते. महासत्तेने काही बाबतीत आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

# सरकारला धडकी भरवणारं भाषण

**संसदेत ज्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांची चर्चा व्हावी असे फार कमी खासदार आहेत. पश्चिम बंगालच्या तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा त्यापैकी एक. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला उत्तर देताना त्यांनी केलेलं भाषण मोदी सरकारला आरसा दाखवणारं होतं. वेगवेगळ्या मुद्यांवर प्रभावी भाष्य करत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केलीय. त्यांच्या भाषणाचा अनंत घोटगाळकर यांनी मराठीत केलेला अनुवाद सध्या वायरल होतोय.**

तृणमूल काँग्रेसच्या खासदार असलेल्या महुआ मोइत्रा संसदेत पहिल्यांदाच निवडून आल्या आहेत. लोकसभेतली त्यांची अभ्यासपूर्ण भाषणं सोशल मीडियावर कायम चर्चेत असतात. मुद्यांची मांडणी, त्यातला खरेपणा आणि आवश्यक तिथं आकडेवारी देणं या सगळ्या गोष्टी सरकारला त्रासदायक ठरतात. शेतकरी, बेरोजगारी, माध्यमं, राष्ट्रवादावरून होत असलेला गदारोळ अशा अनेक मुद्यांवरून त्यांनी सरकारला धारेवर धरलंय. बँकिंग क्षेत्राचा अनुभव गाठीशी असलेल्या महुआ यांनी २००८ मधे पहिल्यांदा काँग्रेस पक्षातून राजकारणात प्रवेश केला. २०१० ला काँग्रेसला रामराम ठोकत तृणमूल काँग्रेसमधे आल्या. त्यानंतर पक्षाकडून पश्चिम बंगालच्या विधानसभेची निवडणूक लढवली. जिंकूनही आल्या. २०१९ ला पश्चिम बंगालच्या कृष्णानगरमधून लोकसभेत पोचल्या. सध्या चर्चेत असलेल्या त्यांच्या भाषणाचा अनंत घोटगाळकर यांनी केलेला मराठी अनुवाद इथं देत आहोत.



सन्माननीय अध्यक्ष महोदय,

महामहीम राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या धन्यवाद प्रस्तावाविरोधात आणि माझ्या पक्षाने या प्रस्तावाला सुचवलेल्या दुरुस्त्यांना पाठींबा देण्यासाठी मी इथे उभी आहे. निव्वळ या सरकारला जाब विचारला किंवा आपल्या देशात जे काही चाललंय त्यासंबंधी आवाज उठवला या एकाच गुन्ह्यासाठी आमचे कितीतरी देशबांधव या घडीला तुरुंगात खितपत पडलेत. न्यायव्यवस्थेकडून किंवा पोलिसांकडून होणारी छळवणूक सोसतायत. एक खासदार या नात्याने मला मिळणाऱ्या संसदीय संरक्षणाचं कवच वापरत जनतेने मला हे व्यासपीठ बहाल केलं. हे व्यासपीठ जनतेच्या मनातले प्रश्न आणि जनतेच्या मनातली भावना व्यक्त करण्यासाठी मी वापरू इच्छिते. यातून सरकारने हे लक्षात घ्यावं की, अटक, हल्ले आणि जनतेची मुस्कटदाबी या गोष्टी चालणार नाहीत. सत्ताधारी पक्षातले माझे सन्माननीय सहकारी माझा आवाज गदारोळ करून दाबणार नाहीत आणि अध्यक्ष महोदय, आपण मला दिलेला पूर्ण वेळ मला बोलू द्याल तसंच आम्हा करदात्याच्या पैशावर चालणारे लोकसभा टीवी चॅनेल माझं भाषण चालू असताना मधेच आपलं प्रक्षेपण थांबवणार नाही असा विश्वास मी बाळगते. एल्मर डेविस हा अमेरिकन पत्रकार स्वतःच्या देशासंदर्भात म्हणाला होता की, हे प्रजासत्ताक काही डरपोक लोकांनी निर्माण केलेलं नाही आणि डरपोक लोक त्याचं रक्षणही करु शकणार नाहीत. त्यांचं हे म्हणणं आपण आपला ७२ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत असताना आपल्यालाही पुरेपूर लागू पडतात. आज मी भ्याडपणा आणि धैर्य तसंच त्या दोघांमधला फरक याबद्दल काही बोलू इच्छिते. अधिकार, सत्ता, द्वेष, कट्टरता आणि असत्याचं अपत्य असलेल्या दिखाऊ शौर्याआड दडलेल्या आणि त्या देखाव्यालाच धैर्य समजण्याचं धाडस करणाऱ्या भ्याडांबद्दल मला काही सांगायचंय. बेलगाम प्रचार आणि चुकीच्या माहितीचा प्रसार हा तर या सरकारने एक कुटिरोद्योगच बनवला आहे. भ्याडपणालाचं धैर्य म्हणून सजवण्यात या सरकारने कमालीचं यश मिळवलंय.

या सरकारने दाखवलेल्या धैर्याची अनेक उदाहरण मी सादर करेन. मनमानी मापदंड वापरुन कोण भारतीय आहे आणि कोण नाही यावर प्रश्न उपस्थित करणारा कायदा आणून आपण मोठं धैर्य दाखवलं असा या सरकारचा दावा आहे. शेजारच्या राष्ट्रात छळ सोसाव्या लागणाऱ्या हिंदू आणि इतर अल्पसंख्यांकांना नागरिकत्व देण्याच्या नावाखाली २०१९ मधे नागरिकत्व सुधारणा कायदा मंजूर करून घेण्यात आला. परंतु त्याचवेळी या कायद्याने पिढ्यानपिढ्या या देशात रहात असलेल्या कोट्यवधी भारतीयांना असुरक्षिततेच्या खाईत लोटलंय. या कायद्याच्या अंमलबजावणीचे नियम मात्र आपल्या गृहमंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, डिसेंबर २०२० पर्यंत तरी अद्याप बनवलेलं नव्हतं. त्याची अंतिम मुदत आता एप्रिल २०२१ पर्यंत पुढे वाढवलेली आहे. शेजारच्या राष्ट्रात छळ होत असलेल्यांबद्दल सरकारला एवढी काळजी असेल तर मग हे नियम निश्चित करून जाहीर करण्याची अंतिम तारीख ते सतत अशी बदलत का राहिले? दरम्यान आमच्यापैकी अनेकांनी 'कागज नहीं दिखाएंगे!' असं धाडसानं ठणकावून सांगितलंय. टागोरांचं मंदिर असलेल्या शांतिनिकेतनवर केंद्र सरकारचं दडपण आणून तुम्ही तुमचा रंग बदलू शकणार नाही. जन गण मन या काव्याची मोजकीच कडवी आपण आपलं राष्ट्रगीत म्हणून स्वीकारलीत. त्या मूळ काव्याचा उरलेला भागही वाचावा अशी मी सरकारला विनंती करते. अशा वाचनामुळे ज्यांना ते 'टॅगोर' म्हणतात त्या कविवर्यांना आणि बंगाललाही ते थोडे नीट जाणू शकतील. काँग्रेस पक्षाचे सभागृहातले आदरणीय नेते आणि माझ्या सहकाऱ्यांनी टागोरांचे नेमके हेच शब्द नुकतेच इथं उद्धृत केलेत. पण मला वाटतं ते पुनःपुन्हा सांगितले तर या देशाचं भलंच होईल.

अहरह तव आह्वान प्रचारित,<br>
शुनि तव उदार बाणी<br>
हिन्दु बौद्ध शिख जैन<br>
पारसिक मुसलमान खृष्टानी<br>
पूरब पश्चिम आसे तव<br>
सिंहासन-पाशे<br>
प्रेमहार हय गाँथा।<br>
जनगण-ऐक्य-विधायक<br>
जय हे भारतभाग्यविधाता!<br>
जय हे, जय हे, जय हे,<br>
जय जय जय जय हे।।<br>
ऐक्याचा जयजयकार!<br>
धार्मिक विविधतेचा जयजयकार!

जगातली सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताचं रूपांतर जवळपास पोलिसी राज्यात करणं हे यांचं धैर्य आहे. याच धैर्याचा परिपाक म्हणून केवळ एका संशयास्पद तक्रारीच्या जोरावर या सदनाच्या एका नामवंत सदस्यांवर आणि देशातल्या एका ज्येष्ठ पत्रकारावर राजद्रोहाचा गुन्हा नोंदवला जातो. हेच ते धैर्य ज्याच्या बळावर जनादेश मिळो न मिळो प्रत्येक राज्य कुटिल कारस्थानं करुन येनकेनप्रकारेण ताब्यात घेतलं जातं. केंद्र आणि राज्य परस्परांशी विधायक सहकार्य आणि सहकारी संघराज्यभावाने बांधील असल्याचा दावा तुम्ही केला होता. राज्य सरकारांशी भागीदारी करण्याऐवजी संधी मिळेल तेव्हा त्यांना जबरदस्तीने सत्तेवरून घालवण्याचा प्रयत्न तुम्ही करता. सत्ताधारी पक्षाची मनीषा काय

**विशेष**

**महुआ मोईत्रा**

आहे? आपली ओळख ते कशी राखू इच्छितात? आपण जगातली सर्वात मोठी लोकशाही चालवणारे आहोत ही की, आपण एकपक्षीय राजवट या देशावर लादलीय? स्वतःलाच हा प्रश्न



जरा विचारुन पहा. केवळ चार तासांच्या पूर्वसूचनेनं लॉकडाऊन घोषित करुन अन्नपाण्यावाचून हजारो लोक शेकडो मैल चाललेत. हे पाहण्याचं धैर्य, लोकांना अभूतपूर्व हालअपेष्टा, अगणित मृत्यू भोगायला लावण्याचं धैर्य! या लोकांना घरी जाता यावं यासाठी केवळ दोन टक्के खर्च उचलला गेला. याउलट आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेतल्या देशांनी २० टक्के तर मध्यम उत्पन्न गटातल्या देशांनीसुद्धा ६ टक्के खर्च केला. हे तुमचं धैर्य! नाही, हे धैर्य नाही. तळाला गेलेली अर्थव्यवस्था थोडी वर आली हे तोंड वर करून सांगण्याच्या धाडसाला निर्लज्ज औद्धत्य म्हणतात. २०२० या वर्षात जगातल्या एकूण एक विकसनशील राष्ट्रांमधे भारताची कामगिरी सर्वात खराब आहे. अगदी या सरकारच्या आर्थिक सर्वेक्षणावर विश्वास ठेवला तरी २०२० मधे आपली अर्थव्यवस्था ७.७ टक्क्यांनी खाली आलीय. २०२१ मधे त्याच्या ११ टक्क्यांनी वाढणार आहे. म्हणजे वस्तुतः २०२२ पर्यंतच्या दोन वर्षांच्या काळात आपली अर्थव्यवस्था २०१९ च्या जीडीपी एवढीच राहील. हे सर्वेक्षण म्हणतं की, अर्थव्यवस्थेतली वाढ हा सर्वात मोठा दारिद्र्य निवारक घटक आहे. सन्माननीय सदस्य हो, पुरी दोन वर्ष आमच्या देशाचा आर्थिक विकास ठप्प असणार आहे. आता यात मिरवण्यासारखं काय आहे हेच मला कळत नाही. मी एका ग्रामीण मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करते. माझ्या मतदारसंघातून स्थलांतर करून कामगार इतरत्र जातात. अतिलघू, लघू आणि मध्यम उद्योगावरचं संकट ही वस्तुस्थिती आहे. आपल्या अर्थव्यवस्थेने घेतलेल्या उसळीचं वास्तव हे आहे की, केवळ मोठमोठे आणि बलाढ्य उद्योग अधिक मोठे आणि अधिक बलाढ्य झालेत. ही उसळी 'व्ही' आकाराची नसून 'के' आकाराची आहे. एक टक्का श्रीमंत आणि यशस्वी मंडळी अधिक श्रीमंत झालीत. आणि एमएसएम क्षेत्रातल्या छोट्या आणि मध्यम उद्योगांच्या अडचणीत आणखी भरच पडलीय. आपण १ लाख १३ हजार कोटी रुपये प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजनेखाली वाटले असं सांगण्याचं धैर्य' सरकार दाखवतं. हा सगळा पैसा याच लाभार्थीकडून आणि मध्यमवर्गीय लोकांकडून पेट्रोल आणि डिझेलवरच्या वाढीव कराच्या रुपाने हडप केला जातोय.

साधन संपत्तीचं सर्व थरात वाटप करुन घेणारा देश असं आपल्या देशांचं आजचं स्वरूप नसून दारिद्र्याचं वाटप करण्याचं नवनवे मार्ग शोधणारा देश आपण बनलो आहोत. आज डंका पिटला जातोय की, अर्थसंकल्प जाहीर होताच शेअर बाजाराच्या निर्देशांकाने बघा कशी उसळी खाल्ली. आपल्या देशात फक्त ६ कोटी म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या केवळ ४.६ टक्के लोक इन्कमटॅक्स भरतात. सगळे मिळून आपले एकूण किती लोक या शेअर्समधे गुंतवणूक करत असतील असं तुम्हाला वाटतं? शेअर बाजारात तेजी आली म्हणून किती लोक आनंदाने उड्या मारू शकतील मला सांगाल? एका अठरा वर्षे वयाच्या पर्यावरण कार्यकर्तीच्या आणि एका अमेरिकन पॉप गायिकेच्या सोशल मीडियातल्या पोस्टसचा प्रतिवाद करण्यासाठी प्रत्यक्ष परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकृत पत्रकाचा वापर करण्याचं असामान्य धैर्य' सरकारने दाखवलं. मात्र राजधानीच्या सीमेवर जवळपास गेले नव्वद दिवस ठाण मांडून बसलेल्या शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या बायकामुलांच्या अन्नपाण्याची किंवा स्वच्छतेची काही व्यवस्था पाहण्यासाठी एकही मंत्रालय या सरकारला वापरता आलेलं नाही. सर्व विरोधी पक्ष आणि देशभरातील शेतकरीच नाही तर प्रत्यक्ष सरकारचे दीर्घकालीन साथीदार असलेले मित्रपक्षसुद्धा हे कायदे स्वीकारार्ह नसल्याचा स्पष्ट इशारा देत असतानाही ते तीन कृषी कायदे अंमलात आणण्याचं धैर्य! या सरकारला मी आठवण देऊ इच्छिते की पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या नेतृत्वाखालच्या भारत सरकारने अकाली नेते संत फत्तेसिंग यांना तीन गोष्टींची हमी दिली होती. पंजाबी भाषिक राज्याची निर्मिती, शेतीउत्पन्नाची खुली सरकारी खरेदी आणि शेतमालाला निश्चित भाव या त्या तीन गोष्टी होत. हे तुमचे कृषी कायदे त्या तीनपैकी दोन गोष्टी हिरावून घेतायत. सर्वसंमती विचारात न घेता हे कायदे बनवले गेले, कोणतीही छाननी न करता मांडले गेले आणि सत्ताधारी पक्षाच्या पाशवी बहुमताच्या जोरावर ते देशाच्या माथी मारले गेले. कायद्यांमुळे या सरकारने 'सदाचारापेक्षा अत्याचार प्रभावी' हे आपले ब्रीद ठामपणे अधोरेखित केलंय. आणि शेतकरी असोत, विद्यार्थी असोत किंवा शाहीन बाग मधल्या वृद्ध स्त्रिया असोत. या देशातला प्रत्येकजण एक तर भ्याड किंवा दहशतवादी असल्याचं दाखवलं जातंय. तुम्ही म्हणताय तुम्ही मोठे धाडशी आहात. तुमच्या पूर्वीच्या कोणत्याच सरकारने केल्या नव्हत्या अशा अनेक गोष्टी तुम्ही केल्या असा तुमचा दावा आहे. खरंच आहे ते! सच्च्या फॅसिस्ट नीतीनुसार आपली प्रत्येक निर्मम, क्षुद्र, सुडाने पेटलेली, द्वेष्टी, कट्टर धर्मांध कृती हा तुम्ही तुमच्या धैर्याचा आविष्कार म्हणून सादर केलाय. असं पूर्वी कुणी केलं नाही खरं पण ते त्यांच्याकडे धैर्याचा अभाव होता म्हणून नाही तर तसं करणे योग्य नाही याचं त्यांना भान होतं म्हणून! हा विचार कधी तुमच्या डोक्यात शिरलाय?

आमच्या सरकारने आमची निराशा केलीय हीच केवळ देशाची शोकांतिका नाही. तर लोकशाहीच्या इतर स्तंभांनी, माध्यमांनी आणि न्यायव्यवस्थेनेही आमची निराशा केलीय ही आमची शोकांतिका आहे. इंग्लंडच्या हाऊस ऑफ लॉर्ड्समधे मजूर पक्षाचे लॉर्ड हेन एकदा म्हणाले होते, 'आपल्या जबाबदाऱ्या आपण पार पाडत नसू आणि योग्य वेळी योग्य तिथं स्वातंत्र्य आणि न्याय ही मूल्यं उचलून धरण्यासाठी आपले विशेष हक्क आपण वापरत नसू तर संसदेच्या या किंवा त्या गृहाचं सदस्य राहण्यात तरी काय अर्थ आहे?' आणि म्हणून आज बंगालची सार्थ कन्या या नात्याने मी इथं उभी आहे आणि मोठ्या धैर्याने उभी आहे. माझ्यावर विश्वास ठेवा बालू की, आमचा लढाऊ बाणा आम्ही सोडलेला नाही. सरकारच्या गरागरा फिरणाऱ्या गिरण्या माझ्या बोलण्याचे चित्रण नंतर भ्याड किंवा अगदी वाङ्मयचौर्य म्हणून करणार असल्या तरी मी जे काही इथे बोलेन त्याबद्दल राजद्रोहाचा किंवा अवमानाचा गुन्हा माझ्यावर लादला जाऊ शकत नाही. या संसदीय विशेषाधिकाराचं कवच वापरत काही कटू सत्य मी या सभागृहासमोर मांडू इच्छिते. आणि कायदा मंत्रीमहोदय, या सभागृहात तुम्ही उपस्थित असलात तरी यावेळी मात्र तुम्हाला माझा आवाज दाबायचा किंवा माझे शब्द कामकाजातून काढून टाकण्याचा प्रयत्न करण्याचा मुळीच अधिकार नाही. हे मी तुम्हाला आदरपूर्वक सांगू इच्छिते. न्यायव्यवस्था नावाची पवित्र गोमाता आता पूर्वीसारखी पवित्र राहिलेली नाही.

(क्रमशः)

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात म्हणून...

**प्रासंगिक**

**अमर हबीब**

पदयात्रा

डॉ.राजीव बसरगेकर यांनी ठरवले की ते ११ मार्चला औंढा नागनाथ येथे महादेवाला साकडे घालून पदयात्रा सुरू करीत. १९ मार्चला चिलगव्हाणला पोचतील. त्यांच्या सोबत पदयात्रा करायला अनेक जण तयार झाले आहेत.

तुम्हाला शक्य असेल तर या पदयात्रेत तुम्हीही सामील होऊ शकता. पूर्ण यात्रेत वेळ देणे शक्य नसेल तर १९ मार्चला महागाव येथे या. तेथून ८ किलोमीटर चालत चिलगव्हाणला जाता येईल.

पदयात्रेचा मार्ग

औंढा नागनाथ ते चिलगव्हाण अशा सुमारे सव्वाशे कि.मी.च्या पदयात्रेचा मार्ग पुढील प्रमाणे ठरवण्यात आला आहे. ११ मार्च- औंढा नागनाथ- येहळेगाव- डिग्रस- कऱ्हाडे, १२ मार्च- डिग्रस- कऱ्हाडे- हिंगोली- खानापूर चिं., १३ मार्च- खानापूर चिं.- कळमनुरी- माळेगाव, १४ मार्च- माळेगाव- बाभळी- शेंबाळ पिंपरी, १५ मार्च- शेंबाळ पिंपरी- मुळावा- पळशी, १६ मार्च- पळशी-मरसुळ- उमरखेड- सुकळी, १७ मार्च- सुकळी- नांदगव्हाण- बिजोरा, १८ मार्च- बिजोरा- मुडाना- महागाव, १९ मार्च- महागाव ते चिलगव्हाण.

सामूहिक श्रद्धांजली

चिलगव्हाण येथे सकाळ पासुनच वर्दळ राहील. अकरा वाजता सत्यपाल महाराज यांचे शिष्य पंकजपाल महाराज यांचे कीर्तन होईल. त्या नंतर अनेक मान्यवर आपल्या भावना व्यक्त करतील. दुपारी ३ वाजता शोकसभा सुरू होईल. आत्महत्या केलेल्या तमाम शेतकर्यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रम संपेल.

शिस्त

१) हे उपोषण कोण्या एका संघटनेचे किंवा कोण्या एका पक्षाचे नाही. ज्यांना शेतकाऱ्याबद्दल बांधिलकी वाटते त्या सर्वांनी एकत्र येऊन करणे चांगले. अशा स्थितीत आपले सर्व अभिनिवेश बाजूला ठेवावे.

२) एकत्र न येताही आपण आपल्या बॅनर खाली उपोषण करू शकता. एवढेच नव्हे तर एकट्याने उपवास करू शकता.३) या उपोषणाच्या निमित्ताने कोणताही वाद उपस्थित होणार नाही याची काळजी घ्यावी.

एका अत्यंत गंभीर विषयावरील हे उपोषण आहे, त्याचे तेवढे गांभीर्य कायम ठेवावे.

विशेष सूचना

१) हे उपोषण सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत करता येईल. सार्वजनिक उपोषण १० ते ५ या वेळेतही करता येईल.

२) डायबेटीज किंवा अन्य रुग्ण वा वृद्ध व्यक्तीने आपल्याला झेपेल एवढ्याच वेळेपुरते उपोषण करावे.

३) विद्यार्थ्यांनी व लहान मुलांनी दोन मिनिटे मौन पाळून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे स्मरण करावे.

शेतकाऱ्यांच्या आत्महत्या सातत्याने होत आल्या आहेत. दर वर्षी हजारो आत्महत्या होत आहेत. आपल्या अवती भोवती वणवा पेटला आहे. तो विझवण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. सर्जकाना स्वतंत्रपणे सुखाने व सन्मानाने जगता यावे यासाठी ही धडपड आहे. प्रत्येक संवेदनशील व्यक्तीने त्यात सहभागी व्हावे!

(समाप्त)

# असा रंगला 'वर्तमान'चा सन्मान सोहळा

माजलगाव : वर्तमान फाऊंडेशन आणि वर्तमान माध्यम समुहाचा सन्मान सोहळा माजलगाव येथील व्यंकटेश कॉन्फरन्स हॉलमध्ये शुक्रवारी सायंकाळी रंगला. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते विविध पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक तर प्रमुख अतिथी म्हणून बीड जिल्हा परिषदेचे सभापती कल्याण आबुज, शिवसेना तालुकाप्रमुख आप्पासाहेब जाधव, माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ यांची उपस्थिती होती. (सर्व छायाचित्रे : ऋषी सोळंके)

























# जिल्ह्याच्या विकासासाठी प्रारूप आराखड्यात ९७ कोटी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला निधी; माजलगावातील नाट्यगृहास विशेष बाब म्हणून मंजूरी

▶ प्रतिनिधी

बीड : जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत बीड जिल्ह्यासाठी २४२ कोटी रुपये नियतव्ययाची मर्यादा नियोजन विभागाने ठरवून दिली होती. परंतु त्यामध्ये सोमवारी झालेल्या बैठकीत ९७.१७ कोटी रुपयांनी वाढ करून सर्वसाधारण योजनेसाठी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी ३४० कोटी मंजूर करण्यात आले. अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चालू वर्षाच्या खर्चाचा आढावा घेतल्यानंतर पुढील वर्षाच्या जिल्हा नियोजन प्रारुप आराखड्यास मंजुरी दिली. जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे व अन्य सर्वच




लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार वाढीव निधी दिल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. यावेळी आमदार प्रकाश सोळंके, आमदार बाळासाहेब आजबे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार संजय दौंड आणि आमदार विक्रम काळे यांनी विविध मागण्या मांडल्या. यावेळी माजलगाव येथील नाट्य गृहासाठी विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात आली.जिल्हाधिकारी श्री. जगताप यांनी प्रारूप आराखड्याचे सादरीकरण केले. तर जिल्ह्याला वाढीव निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह लोकप्रतिनिधींनी अजित पवार यांचे आभार मानले.

# शेलापुरीला 'स्मार्ट ग्राम'चा सन्मान

▶ प्रतिनिधी

माजलगाव : राज्यातील ग्रामपंचायतींना त्यांच्या क्षमतेनुसार शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करून स्वच्छता, व्यवस्थापन व पारंपरिक ऊर्जा आणि पर्यावरण व पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा वापर अशा बाबींवर स्मार्ट ग्रामपंचायतीच्या निवडी संदर्भात ९ फेब्रुवारी रोजी तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींची तपासणी झाली होती त्यानुसार येथील शेलापुरी नांदूर ही ग्रुप ग्रामपंचायत तालुक्यातून स्मार्ट ठरली आहे.

तपासणीत ६३ गुण मिळवत ग्रामपंच्यातची तालुक्यातून पहिला क्रमांक पटकावला. या पुरस्काराची रूपाने गावासाठी २० लाख रुपयांचा निधी प्राप्त होणार आहे. शेलापुरीला स्मार्ट ग्राम करण्यासाठी बाजार समितीचे माजी सभापती तथा विद्यमान संचालक नितीन नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच जनाबाई दिलीप झगडे, उपसरपंच गणेशराव शेंडगे, ग्रामविकास अधिकारी आर.व्ही.झगडे, ग्रा.प.सदस्य, महिला बचत गटाची सदस्य, आशावर्कर, अंगणवाडी ताई आदींनी परिश्रम घेतले.

## 'सांत्वन'पर भेट



माजलगाव : तालुक्यातील फुलपिंपळगाव येथील सरपंच पांडुरंग मते यांच्या वडीलांच्या निधनाबद्दल शिवसेना तालुकाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांनी मते कुटुंबियांची भेट घेवून सांत्वन केले, यावेळी तिर्थराज पांचाळ, शिवसैनिक आदी उपस्थित होते.

# मराठवाडा विकास मंडळास मुदतवाढ द्या

## जनविकास परिषदेची मुख्यमंत्र्याकडे मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मराठवाडा विकास मंडळास मुदतवाढ द्यावी व नगर–बीड–परळी रेल्वे मार्गाच्या कामाची गती वाढवावी अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगावच्या तहसिलदार वैशाली पाटील यांचेमार्फत मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचेकडे दि. १० फेब्रवारी रोजी करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाडा विकास मंडळाची मुदत एप्रिल २०२० मध्ये संपली आहे. मराठवाड्याचा विकास इतर भागाच्या तुलनेत अद्यापही



झालेला नाही. शिक्षण, सिंचन, आरोग्य व रस्ते आदी बाबत मराठवाडा खूपच मागे आहे. करीता मराठवाडा विकास मंडळास त्वरीत मुदत वाढ द्यावी तसेच नगर–बीड–परळी रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण १९९७–९८ मध्ये होवून या रेल्वेमार्गाला मंजुरी देण्यात आली. एकूण २६२ किलोमिटरचा हा रेल्वेमार्ग आहे. राज्य आणि केंद्र सरकार यांच्या संयुक्त भागीदारीत हा रेल्वे मार्ग आहे. पण अद्यापही या रेल्वेमार्गाचे काम पुर्ण झालेले नाही. रेल्वेमार्गाच्या कामाची गती कासवगतीने सुरू असल्याने बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न लांबणीवर पडत आहे. त्यामुळे नगर–बीड–परळी रेल्वेमार्गाच्या कामाची गती वाढवून लवकर हे काम पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर मराठवाडा जनता विकास परिषदेचे प्रमुख मार्गदर्शक माजी आमदार डी.के.देशमुख, अध्यक्ष सुहास देशमुख, बीड जिल्हा सचिव सुमंत गायकवाड, शिरीष देशमुख, प्रा.पी.के.देशमुख, आर.एस.शिवणकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बसपाची जिल्हाभरात घेराव मोहीम

## बसपाचे जिल्हाध्यक्ष ॲड.अमोल डोंगरे यांची माहिती

▶ प्रतिनिधी

माजलगाव : देशातील केंद्र सरकारने केलेल्या डिझेल, पेट्रोल, गॅस भाव दरवाढीच्या विरोधात वजुलमी कृषी कायदा आणि कामगार कायदा, वाढीव वीज बिल, थकीत विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या मनमानी कारभाराच्या विरोधात बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात तहसीलदारांना घेराव घालून बहुजन समाज पार्टीच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती बहुजन समाज पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड.अमोल डोंगरे यांनी दिली.



बसपाचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी खासदार ॲड.विरसिंग, प्रमोद रैना, ॲड.संदीप ताजणे यांच्या दिशानिर्देशावरून बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, पाटोदा, आष्टी, अंबाजोगाई, केज, परळी, धारूर, वडवणी येथील तहसीलदारांना बहुजन समाज पार्टी बीड जिल्हाध्यक्ष ॲड.अमोल डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा प्रभारी प्रशांत वासणिक, प्रदेश सचिव डॉ.अनंत गायकवाड, जिल्हा प्रभारी सतिश कापसे, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब जगताप, जिल्हा कोषाध्यक्ष अनिल सिरसट, कुमार फुलवरे, जिल्हा सचिव सागर हनवते, सतिश पाटेकर, चंदरलाल बनगे, संजय हराळ, विष्णु गाडेकर, जितेंद्र गायसमुद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेराव घालून आंदोलन करण्यात येणार असल्याचे पत्रक बहुजन समाज पार्टी बीड जिल्हाध्यक्ष ॲड.अमोल डोंगरे यांनी काढले असून यावेळी बीड विधान सभा अध्यक्ष रजनीकांत वाघमारे, गेवराई विधानसभा अध्यक्ष राहुल सिरसट, केज विधानसभा अध्यक्ष धम्मानंद जोगदंड, परळी विधानसभा अध्यक्ष ॲड. बुध्दरत्न उजगरे, माजलगाव विधानसभा अध्यक्ष अरविंद लोंढे, आष्टी–पाटोदा विधानसभा अध्यक्ष बाबासाहेब अडागळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## तुळजाभवानी अर्बनच्या एटीएमचा शुभारंभ





परभणी : तुळजाभवानी अर्बनच्या (सोनपेठ शाखा) येथे एटीएम सुविधेचा शुभारंभ झाला. याप्रसंगी माजी आमदार व्यंकटराव कदम, माजी नगराध्यक्ष चंद्रकांत राठोड, रा.यु.काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा सोनपेठचे नगरसेवक श्रीकांत विटेवर, परभणीचे शिवसेना जिल्हा उपप्रमुख मधुकर निरपणे, विट्याचे सरपंच मदनराव भोसले, कृ.उ.बा.समितीचे संचालक शिवाजीराव भोसले, तुळजाभवानी अर्बनचे संस्थापक चंद्रकांत शेजुळ आदी. दुसऱ्या छायाचित्र एटीएममधून पैसे काढताना चंद्रकांत शेजुळ दिसत आहेत.

## भटके–विमुक्त आघाडीच्या युवा जिल्हाध्यक्षपदी नारायण मेंडके

▶ प्रतिनिधी



माजलगाव : तालुक्यातील नेहमी सामाजिक कार्यात सदैव तत्पर असणारे सामाजिक भान ठेवून सर्व समाज बांधवांना नवी दिशा देणारे नारायण मेंडके यांची भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांच्या आदेशाने भाजपच्या भटके–विमुक्त आघाडीच्या बीड जिल्हा युवा अध्यक्षपदी यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष नरेंद्र पवार, भाजपा बीड जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मस्के, रमेश आडसकर, ज्ञानेश्वर मेंडके, डॉ.लक्ष्मण जाधव, अमोल गायकवाड, अरुण राऊत यांच्या उपस्थितीत पत्र देण्यात आले.

पान १ वरुन

# 'वर्तमान' म्हणजे सकारात्मक पत्रकारिता

वर्तमान माध्यम समूह आणि वर्तमान फाऊंडेशनने सामाजिक बांधिलकीतून कार्यरत असणाऱ्यांचा सन्मान सोहळा आयोजित केला. 'वर्तमान'ची पत्रकारिता विकासात्मक असून माजलगाव सारख्या ग्रामीण भागातून दर्जेदार वृत्तपत्र निघत आहे. या वृत्तपत्राने भविष्यात नावलौकिक करावा, अशा शब्दांत सदिच्छा व्यक्त केल्या.

समाजकल्याण सभापती कल्याण आबुज म्हणाले, 'वर्तमान'चे कार्य अल्पावधीत उल्लेखनीय असून सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाजात वेगळेपणाने कार्य करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान झाला, ही त्यांच्या कार्याची पोचपावती आहे. या सन्मान सोहळ्याला राष्ट्रवादीचे नेते जयदत्त नरवडे, ॲड.भानुदास डक, पंचायत समितीनेमली सदस्य शशांक सोळंके, मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष राजेश घोडे, भाजपा नेते बालासाहेब केकान, माजलगाव तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनचे सचिव संजय सपाटे, उपाध्यक्ष अनंत शेंडगे, सिध्दराज अर्बनचे संस्थापक अध्यक्ष अशोक सोळंके, डॉ.सत्येंद्र दबडगावकर, पत्रकार हरिष यादव यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.रमेश गटकळ यांनी केले तर आभार वर्तमानचे संपादक तथा वर्तमान फाऊंडेशनचे अध्यक्ष भगीरथ तोडकरी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वर्तमान टीमचे सदस्य चंद्रकांत जाधवर, शेख ताहेर, अच्युत लिंगायत, गणेश शिंदे, प्रशांत सातपुते, कृष्णा कानडे, सचिन पट्टेकर, महेश बोटवे, गोविंद देशमाने, अभिजित कोंबडे, ज्ञानेश्वर अंबुरे पाटील, ऋषी गोळेकर, दीपक गडसिंग, प्रदिप तांबे, अभिजित देडे, तुकाराम कळसाईतकर, विजय पांचाळ यांनी परिश्रम घेतले.

# 'निराधारांना आधार देणारे डाके कुटुंबीय'

▶ प्रतिनिधी

माजलगाव : वाढदिवसावर होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देत मागील आठ वर्षापासून सातत्याने सामाजिक उपक्रम राबविणारे डॉ.अजयसिंह डाके यांनी यावर्षीही मागील वर्षभराच्या कालावधीत पितृछत्र हरवलेल्या सात कुटुंबियांना प्रत्येक पाच हजार रूपयांची आर्थिक मदत व त्याच कुटुंबियांतील शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करत निराधारांना आधार देणारा डाके कुटुंबियांचा त्सुत्य उपक्रम राबविला असल्याचे मत माजलगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी प्रज्ञा माने यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील सोन्नाथडी येथे डॉ.अजयसिंह डाके यांच्या वाढदिवसानिमीत्त नेत्रतपासणी शिबीर, पितृछत्र हरवलेल्या सात कुटूंबीयांना आर्थिक मदत व शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात दि. ७ फेब्रुवारीला त्या बोलत होत्या. या शिबीरात दोनशे रूग्णांची नेत्रतपासणी मोफत करण्यात आली. अध्यक्षस्थांनी ॲड. भानुदास डक हे तर गटविकास अधिकारी प्रज्ञा माने, जय महेश कारखान्याचे उपाध्यक्ष गिरीष लोखंडे, दत्तात्रय आहेरकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक निलेश इधाते, डॉ.अजयसिंह डाके, मिलिंद लगाडे, अंकुश राठोड यांची उपस्थिती होती. मागील वर्षभराच्या कालावधीमध्ये वेगवेगळ्या कारणाने कुटुंब प्रमुखांचे निधन झाले. अशा सात कुटूंबीयांना प्रत्येक पाच हजार रूपयांची आर्थिक मदत व शालेय साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मागील सात ते आठ वर्षापासुन डॉ.डाके सामाजिक उपक्रम राबवितात.



# राष्ट्रीय महामार्गावर वाहतेय गटारीचे पाणी

## नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतोय



▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील करवा पेट्रोल पंप ते मौलाना आझाद चौकापर्यत नाली नसल्यामुळे गटाराच्या पाण्याच्या त्रासामुळे शहरात ये–जा करणाऱ्या नागरिकांना या पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी या नालीचे बांधकाम तात्काळ करावे, अशी मागणी येथील समाजसेवक अरूण गोसावी यांनी केली आहे.

खामगाव–पंढरपूर पालखी महामार्ग माजलगाव शहरातून झाला आहे, परंतु शहरातील करवा पेट्रोल पंप ते मौलाना आझाद चौक, सिंदफणा नदीपर्यत महामार्गाच्या गुत्तेदार आणि अधिकाऱ्यांनी नाली बांधकाम न केल्यामुळे शहरातील सांडपाणी रस्त्यावरूनच वाहत असल्यामुळे शहरात येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना ग्रामस्थांना खूप त्रास सहन करावा लागत आहे.

या पाण्यामुळे अनेक अपघातही झाले आहेत अनेकांच्या अंगावर गाड्यांनी उडून हे सांडपाणी गेल्यामुळे अनेकांचे कपडेही खराब होत आहेत. या गटाराच्या पाण्याला जनता वैतागली आहे या नालीचे बांधकाम करुन पाण्याचा बंदोबस्त करण्याबाबत तालुक्यातील मोगरा येथील समाजसेवक अरुण गोसावी यांनी माजलगावचे तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनाही लेखी तक्रारी दिल्या आहेत. त्याच बरोबर एम.एस.आर.डी.सी.चे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम जाधव यांनाही लेखी अर्ज देऊन या पाण्याचा त्वरित बंदोबस्त करावा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**